# शिक्षणाबाबतचा अनुभव

दर शनिवारी प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी दोन -तीन तास एक वर्ग आमच्याकडे चालविला जातो. हेतू असा की, रचनावादी पद्धतींनी, साधनांच्या सहाय्याने मुलांच्या विविध विषयांमधील संकल्पना स्पष्ट व्हाव्या, पक्क्या व्हाव्या; आणि पालकांनाही या वेगळ्या पद्धतीची जवळून ओळख व्हावी.

त्यादिवशी त्या दोन मुलींना त्यांची आई आमच्या वर्गासाठी सोडून गेली. परत न्यायला यायला तिला थोडासा उशीर होणार होता; म्हणून वर्ग संपल्यावर त्या मुली माझ्याशी खेळत बसल्या. माझ्या घरातच एक पांढराशुभ्र फळा टांगलेला आहे. मोठीने विचारले, 'आम्ही फळ्यावर लिहू ?' मी अर्थातच होकार दिला.

मोठी आणि छोटी दोघी फळ्याकडे गेल्या. मोठीने लगेच मध्यभागी रेघ काढून फळ्याची दोघींमध्ये वाटणी केली; आणि छोटीला फक्त तिच्याच भागात लिहिण्याचा आदेश दिला.

छोटी पहिलीत होती. तिने माहित असलेले शब्द फळ्यावर लिहायला सुरूवात केली. पुढे सुचेनात तेव्हा एखाद्या पुस्तकाची मागणी केली. जे दिल्यावर त्यातील काही शब्द लिहून काढले. मनात आले, या छोटीला शब्दच लिहावेसे का वाटले ? चित्र काढावे, स्वतःचे नाव लिहावे किंवा आणखी काही करावेसे का वाटले नाही? तिच्या मनात फळ्याची सांगड केवळ अभ्यासाशी का असावी?

मोठीने तिच्या जागेत मनानेच -म्हणजे आठवून-शाळेतील कवितेच्या धड्यावरील प्रश्न लिहिला. 'कवीला बागेत काय दिसले?' लगेच खाली उत्तर लिहिले, 'कवीला बागेत फुले दिसली'. अशाप्रकारे एकापाठोपाठ एक असे प्रश्न आणि त्यांची अपेक्षित उत्तरे लिहिली. याला साक्षी असलेला मी हबकून गेलो. मोठी तिसरीत होती. तिला सुट्टीच्या वेळात सुद्धा खेळावेसे वाटले नाही? चित्रे काढावीशी का वाटली नाहीत? तिला कविता जोरजोराने म्हणावीशी का वाटली नाही?

फळा-खडू, प्रश्न - उत्तरे याने तिचे सारे मानसिक जीवन भरून गेलेले आहे की काय ? शाळेतील प्रश्नोत्तरांनीच तिचे दैनंदिन जीवन संकुचित केले आहे की काय ?

शाळेतील शिक्षक-शिक्षिका नि घरी आई -बाबा सगळयांनीच लहान मुलांच्या मानेवर प्रश्नोत्तरी अभ्यासचे जूं, टांगून त्यांना घाण्याच्या बैलांसारखे परीक्षेभोवती फिरविण्याचे ठरविले असले तर आपण तरी काय करणार? मुलांना प्रश्न कधी पडणार ? मुले उत्तरांचा शोध स्वतः घ्यायला कधी शिकणार ? मुलांना घाण्याचे बैल आणि त्यांच्या मानेवरचे जू तरी कधी दाखवणार? मुले वास्तव जीवनाला कशी भिडणार?

आम्ही मित्रमंडळींनी 'मूल कसे शिकते' याचा शास्त्रीय अभ्यास करायचे ठरवले. शरीरशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र अशा क्षेत्रात समजावून घेण्यासाठी हिंडलो. खूप काही नवे सापडू लागले. शिक्षणात काही मूलभूत बदल करावे लागतील अशा सूचना देणारे नवे संशोधनही आढळले. विचार आला की, लहान मुलांच्या शिक्षणाशी संबंधित असणाऱ्या शिक्षक -पालक - संस्थाचालक यांच्यापुढे ही नवीन माहिती आणावी. या माहितीचा त्यांना तर प्रत्यक्षात आणि दैनंदिन उपयोग होईल.

असे ठरले की एक शिबीर घ्यावे. शे-दोनशे संबंधित लोकांना आवर्जून आमंत्रित करावे. शिबीर एखाद्या शाळा - कॉलेजच्या हॉलमध्ये घ्यावे. म्हणजे तेथील शिक्षक प्राध्यापकांनाही या नवीन माहितीची शिदोरी द्यावी. यासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयच बरे असेही ठरले. कदाचित तेथील प्राध्यापक शिबीरात आपल्या ज्ञानाचीही भर घालतील.

जागा निश्चित करायला, त्या मोठ्या शहरातल्या, त्या मोठ्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्यांना भेटलो. त्यांना भेटणे आणि या शैक्षणिक कामात त्यांचा सर्वतोपरी सहभाग मिळवणे यासाठी त्यांच्याच एका विद्यार्थ्याला आम्ही पुढे केले. आम्ही बरोबर होतोच.

विद्यार्थ्यांने आमची त्या प्राचार्यांशी ओळख करून दिली. आम्ही शिक्षणाबाहेरची माणसे त्यांच्या शिक्षणशास्त्राच्या प्रांगणात उतरून काही करतोय ही कल्पनाच त्यांना बरी वाटली नाही. त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्याला म्हटले, 'हे बघ तू तर इथेच शिकतोयस, आपण सगळंच शिकतो, मग आता 'मूल कसे शिकते' हे नव्याने काय शिकायचे. कित्येक वर्षे आपण इथे ते शिकवतोच आहोत की!'

मी तोंड खुपसले. 'पण, बरीच नवी माहिती, नवे संशोधन आले आहे...' 'तसं काही नाही!' ते ठामपणे म्हणाले. 'आमचा अभ्यासक्रम परिपूर्ण आहे. गेली कित्येक वर्षे आम्ही तो यशस्वीपणे राबवतो आहोत. आमच्या महाविद्यालयाचा रिझल्ट.....' इत्यादी! ते प्राचार्य त्यांच्या कॉलेजच्या यशाचे गोडवे गाऊ लागले.

आम्हा सगळयांनाच धक्का बसला. प्राचार्य म्हणतात तेच शिक्षण. अनेक वर्षे चालत आलेला अभ्यासक्रम, त्यात नवनवीन संशोधनांची, त्यांच्या निष्कर्षांची, माहितीची भर पडण्याचा मार्गच बंद. विद्यार्थी अधिक चांगले गुण कसे मिळवतील यापलीकडे चांगल्या शिक्षणाची संकल्पना सरकत नाही.

म्हणजे शिक्षण प्रवाही नाही. जुन्याच रामकुंडात सगळयांनी पिढ्यानपिढ्या स्नान करायचे. प्राचार्य प्राध्यापकांनी शाही स्नान उरकायचे. एकाच डबक्यात बुचकळून निघायचे.

❖